Shri Shahu Chhatrapati Shikshan Sanstha's
Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur's

# SHAHAJI BULLETIN
(शहाजी वार्तापत्र)

E-mail : sscm34.cl@unishivaji.ac.in • प्रेरणा : मा. श्री. मानसिंग बोंद्रे, चेअरमन, श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, मा. श्री. विजयराव बोंद्रे, मानद सचिव, श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था

• संपादक : प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण • कार्यकारी संपादक : डॉ. सुरेश शिखरे • सहसंपादक : डॉ. पी. बी. पाटील • वर्ष दुसरे अंक ६वा (एप्रिल / मे/ जून २०१९)



## *नव्या विचारांचे स्वागत !*

'शहाजी वार्ता'ने दुसऱ्या वर्षात पदार्पण केले आहे. गेल्या वर्षी एक विशिष्ट विचार मनात ठेऊन, विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या कार्यकर्तृत्वाला गौरवास्पद व्यासपीठ या उपक्रमने प्राप्त झाले. विशेषत: विविध उपक्रम, कार्यक्रम व निवडी यांसह समजोपयोगी कार्यातील सहभागाला मेठ्या समूहापर्यंत पोहचविण्यात 'शहाजी वार्ता'मुळे अधिक सुलभ झाले. आपल्या या उपक्रमचे कौतुक विविध स्तरातून होत असून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. देवानंद शिंदे, प्रकुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के, संस्थेचे चेअरमन मा. श्री. मनसिंग बोंद्रे, मनद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, माजी शैक्षणिक सल्लागार मा. प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांच्यासह विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, जाणकारांनी हा उपक्रम सातत्याने पुढे सुरू राहावा अशा शुभेच्छाही दिल्या.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० ला सुरूवात होत आहे. या वर्षी कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर नवा बदल होत आहे. इ. ११ वीचा नवीन अभ्यासक्रम व नवी शैक्षणिक प्रणाली लागू होत असून त्यादृष्टीने अध्यापनाच्या पातळीवर नवे प्रयोग करण्यास पुरेसा वाव मिळणार आहे. इ. १२ वीला असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुन्या अभ्यासक्रमनुसार अखेरची संधी मिळणार असून जास्तीत जास्त विद्यार्थी उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम सुरू केले आहेत.

वरिष्ठ महाविद्यालयाच्या दृष्टीने या वर्षी 'नॅक'चे तिसरे मूल्यांकन होणे अपेक्षित आहे. गेल्या वर्षभरामध्ये बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.सी.ए., एम.कॉम. अशा सर्व शाखांमध्ये अनेकविध उपक्रम सुरू झाले. परीक्षा पद्धतीत नवे प्रयोग करताना सरप्रायझींग टेस्ट, ओपन बुक एक्झाम, वस्तूनिष्ठ प्रश्न मूल्यांकनाच्या विविध पद्धती अवलंबल्या. विद्यार्थ्यांचा सहभाग वाढण्याच्या दृष्टीने प्रश्नमंजूषा, सॉक्रेटिक क्लब, वक्तृत्व व निबंध स्पर्धा, भित्तीपत्रकांची निर्मिती, ग्रीन कॉर्नर, ॲनिमल प्लॅनेट, आओ भाषा शिखे, इंग्रजी गॅलरी आदि नाविण्यपूर्ण उपक्रमंना चालना दिली. विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष मातीशी संबंध यावा यासाठी 'एक दिवस शेतावर' सारखा अभिनव उपक्रम राबविला. या बरोबर बहुतांश सर्व विषयाचे जाणकार, तज्ज्ञ, मर्गदर्शक व्याख्यानाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यास आले. या व अशा नाविण्यपूर्ण प्रयोगांमुळे महाविद्यालय शैक्षणिक जाणिवांचे भरण करण्यास निश्चितपणे यशस्वी होत आहे याचा मला विश्वास आहे.

प्राध्यापक मित्रहो, महाविद्यालयाचा शैक्षणिक व प्रशासकीय पसारा खूप मेठा आहे. गेल्या वर्षभरामध्ये या दोन्ही विभागांचे नेतृत्त्व करीत असताना मी अनेक अनुभवांनी समृद्ध होत आहे. मला याची जाणीव आहे की, सगळेच साध्य करता येत नाही पण आपला प्रयत्न प्रामाणिक असेल तर यशप्राप्ती फार दूर राहात नाही. मला खात्री आहे आपण स्वत:सह संस्था व महाविद्यालयाच्या उत्कर्षासाठी नेहमीच मझ्या सोबत राहाल. नव्या शैक्षणिक वर्षामध्ये एकदिलाने, एकमताने पुढे पाऊल टाकूया! विद्यार्थ्यांसह तुमच्या मनातील नव्या विचारांचे स्वागत करण्यास मला निश्चितच आनंद आहे!

धन्यवाद !





पहिल्या छायाचित्रात छत्रपती शाहू महाराज यांच्या १४५ जयंती निमित्त अभिवादन करताना संस्थेचे चेअरमन मा. श्री. मानसिंग विजयराव बोंद्रे, व्हा. चेअरमन मा. श्री. बाबासाहेब पाटील-भुयेकर, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व उपस्थित मान्यवर.
दुसऱ्या छायाचित्रात छत्रपती शाहू महाराज यांच्या १४५ जयंती निमित्त आयोजित शोभायात्रेत सहभागी मान्यवर.

## राजर्षी शाहू महाराज यांच्या १४५ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !

राजर्षी शाहू महाराज यांच्या १४५व्या जयंतीनिमित्त श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था व श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम राबविले. प्रारंभी श्री शाहू छत्रपती यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संस्थेच्यावतीने शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्ररथ तयार करण्यात आला होता. या चित्ररथाचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन मा. मानसिंग विजयराव बोंद्रे यांचे हस्ते झाले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, सर्व प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समर्पण आणि सातत्य हीच यशाची गुरूकिल्ली : डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी



महाविद्यालयाच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात बोलताना कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त मा. डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व उपस्थित मान्यवर.

'समर्पण आणि सातत्य हीच यशाची गुरूकिल्ली आहे' याची जाणीव विद्यार्थ्यांनी सतत ठेवावी. समोर ध्येय ठेवून त्यासाठी स्वत:ला झोकून द्यावे, असे प्रतिपादन कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांनी केले.

महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.सी.ए., एम.कॉम. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्रारंभी डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व प्राध्यापक-प्रशासकीय वृंद यांच्या उपस्थितीत 'व्यसनमुक्त महाविद्यालय परिसर' फलकाचे अनावरण झाले. सर्व विभागातील प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे तुळशीचे रोप देऊन प्रातिनिधिक स्वरूपात स्वागत करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

आपल्या विद्यार्थीदशेतील जीवनपट उपस्थित विद्यार्थ्यांना उलगडून दाखविताना डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी म्हणाले, आमच्या वेळी माफक संधी होत्या. आता विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. या संधीचा शोध घेताना आपले व्यक्तिमत्व विकसित करावे लागेल. त्यासाठी पदवीबरोबरच महाविद्यालयात सुरू असलेल्या इतर व्यावसायिक कोर्ससुद्धा करावेत. याचा उपयोग विद्यार्थ्यांना केंव्हाना केव्हा निश्चितच होईल. महाविद्यालयाचे संस्थापक स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांचे कार्य मोठे असून त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात विशेष लक्ष दिल्याचे डॉ. कलशेट्टी यांनी आवर्जून नमूद केले.

स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले. महाविद्यालयाची परंपरा, विविध उपक्रम, विविध अभ्यासक्रम याची माहिती त्यांनी यावेळी करून दिली.

## छत्रपती राजाराम महाराज जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



छत्रपती राजाराम महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना दैनिक लोकमतचे संपादक श्री. वसंत भोसले, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व उपस्थित मान्यवर.

## नवीन शैक्षणिक धोरणाचा गांभीर्याने विचार व्हायला हवा : प्रा. डॉ. भालबा विभूते

नवीन शैक्षणिक धोरण मसूदा-२०१९ मध्ये भारतातील शिक्षण व्यवस्थेत अनेक बदल सुचवलेले आहेत. या बदलांमुळे एक शाखा असणारी महाविद्यालये बंद करावी लागतील अथवा त्या महाविद्यालयात अनेक शाखा सुरू कराव्या लागतील. या नव्या धोरणात अनेक दुरूस्त्या कराव्या लागतील. ३१ जुलै २०१९ पर्यंत या दुरूस्त्या सुचविल्या नाहीत तर २०४० पर्यंत हेच धोरण राबविले जाईल. यामुळे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणसंस्था यांचेवर दूरगामी परिणाम होतील असे प्रतिपादन ज्येष्ठ शैक्षणिक विचारवंत प्रा. डॉ. भालबा विभूते यांनी केले.

महाविद्यालयातील शाहू क्लबच्या उद्घाटन प्रसंगी आणि नवीन शैक्षणिक धोरण या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानात डॉ. विभूते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी राजर्षी शाहू महराज यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शाहू क्लबचे उद्घाटन करण्यात आले.

डॉ. विभूते म्हणाले, १९८६ च्या शैक्षणिक धोरणातील अनेक घटक या नवीन शैक्षणिक धोरणात बदललेले आहेत. १०+२+३ हा स्तर बदलून पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक आणि वरिष्ठ शैक्षणिक स्तर ठेवण्यात आला आहे. यामुळे स्वतंत्र असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांचे अस्तित्व संपुष्टात येऊन ती माध्यमिक विभागाला जोडली जातील.



शाहू क्लब उद्घाटन प्रसंगी 'नवीन शैक्षणिक धोरण-२०१९' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. भालबा विभुते व प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. सुरेश शिखरे व उपस्थित मान्यवर.

प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण म्हणाले, वरिष्ठ महाविद्यालयांनी वेळीच आपल्यात बदल केले नाहीत, शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या विकासाबरोबर आपला शैक्षणिक, संशोधनात्मक विकास साधला नाही तर स्पर्धेत त्यांना टिकून राहणे अवघड होईल.

## शहाजीमध्ये विद्यार्थिनींशी आरोग्यविषयक सुसंवाद व 'सखी मंच'चे उद्घाटन



सखी मंचचे उद्घाटन करताना डॉ. हसिना म्हैशाळे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व सखी मंच सदस्या

'विद्यार्थिनींनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी' या विषयावर प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. हसिना म्हैशाळे यांनी मुलींना अत्यंत साध्या सोप्या भाषेत आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. मुलींच्या अनेक प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी मुलींना आरोग्य-विषयक मार्गदर्शन करत मानसिक स्वास्थ्यता कशी राखावी याबद्दल मौलिक विचार मांडले. महाविद्यालयातील स्त्री व्यक्तिमत्व विकास समिती संचलित 'सखी मंच'च्या उद्घाटनप्रसंगी 'विद्यार्थिनींशी सुसंवाद' या आयोग्यविषयक कार्यक्रमात ते बोलत होते. कु. माधुरी चेचर या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत निवड झाल्याबद्दल यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन स्त्री व्यक्तिमत्व विकास समितीने केले.

## 'सिडबॉल' लोकसहभागाचा पर्यावरणपूरक उपक्रम

### निसर्गप्रेमींचा विश्वास, वृक्ष संवर्धनासाठी 'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशनचा पुढाकार



सिडबॉल तयार करताना सहभागी विद्यार्थी सोबत श्री. अनिल चौगुले, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व उपस्थित मान्यवर.

पर्यावरणाच्या जतन व संवर्धनासाठी 'सिडबॉल उपक्रम' आवश्यक आहे. वृक्षसंपदा जपण्यासाठी लोकसहभागातून हा उपक्रम राबविणे काळाची गरज आहे. या उद्देशाने एका व्यासपीठावर या उपक्रमात सहभागी होत आहोत अशी भावना करवीरनगरीतील ट्रेकर्स, दुर्गप्रेमी, निसर्गप्रेमी यांनी व्यक्त केली. निमित्त होते 'दैनिक पुढारी'च्या प्रयोग सोशल फाऊंडेशनतर्फे आयोजित 'सिडबॉल मेकिंग' कार्यशाळेचे. लोकसहभागाची ही पर्यावरणपूरक कार्यशाळा महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग व दि कन्झर्व्हेशन ऑफ इंडिया यांच्या माध्यमातून संपन्न झाली.

आशिष घेवडे यांनी माती, शेणखत आणि स्थानिक प्रजातीच्या बियांपासून सिडबॉल तयार करून दाखविले. डॉ. अमर आडके म्हणाले, गडकोट हा आपला समृद्ध वारसा आहे. त्याचे पर्यावरणपूरक अस्तित्व जपण्यासाठी वृक्षसंपदा वाढीस लागली पाहिजे. सिडबॉलसारख्या उपक्रमातून त्याला हातभार लागू शकतो. गडकोट भ्रमंती करताना सिडबॉलचे रोपण करणे आवश्यक आहे. अनिल चौगुले म्हणाले, सिडबॉल या उपक्रमासाठी प्रथम बियांचे संकलन (सिडबँक) ही संकल्पना राबविणे गरजेचे आहे. सिडबॉलचे रोपण करून त्याचे वेळोवेळी निरिक्षण करून त्यापासून रोपे होण्यासाठी काळजी घ्यावी. प्राचार्य डॉ. शानेदिवाण यांनी या उपक्रमाचे कौतुक करून या उपक्रमात प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा सहभाग नेहमीच असेल अशी ग्वाही दिली.

यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, निसर्गमित्र संस्थेचे अनिल चौगुले, दुर्ग अभ्यासक डॉ. अमर आडके, कोल्हापूर हायकर्सचे सागर पाटील, अॅडव्हेंचर गिअरचे विनायक कालेकर, दिनेश साळोखे, समेट अॅडव्हेंचरचे विनोद कांबोज, दि कन्झर्व्हेन ऑफ इंडियाचे आशिष घेवडे, संतोष रसाळ, डॉ. मकरंद ऐतवडे, प्रा. दीपा पाटील, प्रा. एस. पी. कर्जुळे, डॉ. पी. पी. जाधव यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोल्हापूरच्या विकासात राजाराम महाराजांचे मोठे योगदान : वसंत भोसले

### श्री शहाजी महाविद्यालयात श्रीपतराव बोंद्रे दादा व्याख्यानमाला संपन्न

कोल्हापूरच्या विकासाची पायाभरणी शाहू महाराजांनी केली असली तरी त्यावर इमारत व कळस चढवण्याचे कार्य शाहू महाराजांचे पुत्र छत्रपती राजाराम महाराजांनी केले आहे. राधानगरी धरणाचे काम, कोल्हापूर विमानतळाचे काम राजाराम महाराजांनी पूर्ण केले. एवढेच नव्हे तर कोकण रेल्वेचे स्वप्नही त्यांनी पाहिले होते. त्यांच्या विचाराने गेलो तर कोल्हापूरची सर्व प्रश्न मार्गी लागतील असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व दैनिक लोकमतचे संपादक श्री. वसंत भोसले यांनी केले.

महाविद्यालयात कै. श्रीपतराव बोंद्रे दादा स्मृती व्याख्यानमालेचे चौथे पुष्प श्री. भोसले यांनी गुंफले. यावेळी ते 'छत्रपती राजाराम महाराजांचे कोल्हापूर संस्थानाच्या विकासातील योगदान' या विषयावरील व्याख्यानात प्रमुख पाहुणे ते म्हणून बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी श्री. भोसले यांचे हस्ते (स्व.) श्रीपतरावदादांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

श्री. भोसले म्हणाले, कोल्हापूरच्या विमानतळाचा प्रश्न आपण रोज वाचतो. परंतु राजाराम महाराजांनी १९३९ मध्ये कोल्हापूरात विमानतळ सुरू करून सन १९३९ मध्ये पहिले विमान सुरू केले होते. आठवड्यातून तीन दिवस ते विमान विनाखंड सुरू होते. हे विमानतळ कायमस्वरूपी सुरू ठेवले असते तर कोल्हापूर दुप्पट विकसित झाले असते.

शाहू महाराजांनी कोल्हापूर ते मिरज रेल्वे सुरू केली. राजाराम महाराजांनी कोल्हापूर ते कोकण रेल्वे सुरू करण्यासाठी आराखडे तयार करून तसे स्वप्न पाहिले. सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण हा शाहू महाराजांचा विचार नेटाने पुढे नेला. अनेक शाळा सुरू केल्या. बी.टी. कॉलेज हे शिक्षकांसाठीचे ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. राजाराम कॉलेज, शिवाजी विद्यापीठाचे स्वप्न त्यांनी पाहिले.

ते पुढे म्हणाले, दसरा चौकातील शाहू महाराजांचा पुतळा त्यांनीच उभा केला. राजांच्या गाडीवर असणाऱ्या बाळू चव्हाण या चालकाला त्यांनी जे. जे. आर्टस् स्कूलमध्ये पाठवून विख्यात चित्रकार बनवले.



कै. श्री. श्रीपतराव बोंद्रे दादा स्मृती व्याख्यानमालेमध्ये मार्गदर्शन करताना दैनिक लोकमतचे संपादक मा. श्री. वसंत भोसले व प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. सुरेश शिखरे व उपस्थित मान्यवर

केवळ अठरा वर्षे राज्यकारभार केलेल्या राजाराम महाराजांचे कार्य शाहू महाराजांच्या कार्याइतकेच मोठे आहे. शाहू महाराज व राजाराम महाराज हे दोन मोठे वृक्ष होते. परंतु इतिहासकारांचे राजाराम महाराजांच्या कार्याकडे दुर्लक्ष झाले आहे. (स्व.) श्रीपतराव बोंद्रे दादांनी शेती आणि शिक्षण क्षेत्रात मोठे काम केल्याचे सांगून श्री. भोसले म्हणाले कोल्हापूरचे गुळाचे सौदे सुरू होताना नेहमी बोंद्रे दादांची आठवण होते. गूळ सौद्यांना त्यांनी एक शिस्त लावली होती.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण म्हणाले, आधुनिक कोल्हापूरच्या विकासासाठी मोठे कार्य केलेल्या राजाराम महाराजांचा व्हिनस कॉर्नरला मोठा पुतळा आहे. त्या चौकाचे नाव व्हिनस कॉर्नर ऐवजी 'राजाराम महाराज चौक' असे झाले पाहिजे. व्याख्यानमालेच्या माध्यमातून (स्व.) श्रीपतराव बोंद्रे दादांच्यावर ज्यांच्या विचारांचा प्रभाव होता त्यांच्या विचारांचा जागर आम्ही या व्याख्यानांच्या माध्यमातून करत आहोत. या व्याख्यानमालेचे आयोजन कै. श्रीपतराव बोंद्रे दादा स्मृती व्याख्यानमाला समितीने केले.

## बी.सी.ए. विभागातर्फे Cyber Security & Cyber Crime या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

महाविद्यालयातील बीसीए विभागातर्फे **Cyber Security and Cyber Crime** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अमित सर्जे (पोलीस नाईक) आणि श्री. सचिन बेंडखळे (पोलीस कॉन्स्टेबल) हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते. श्री. अमित सर्जे यांनी, सायबर क्राईम म्हणजे काय? समाजामध्ये असे सामबर गुन्हे कसे घडत आहेत आणि त्या पासून आपला बचाव कसा करता येईल याबाबत विद्यार्थ्यांना खूप सोप्या शब्दात सांगितले. तसेच सायबर गुन्ह्यासंदर्भात कायद्यातील तरतूदी बद्दलही माहिती करून दिली. या व्याख्यानाचा बी.सी.सी. भाग-१,२ व ३ विद्यार्थी उपस्थिती होते. **IQAC** समन्वयक डॉ. एन. एस. जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



'सायबर सिक्युरिटी' या विषयावर मार्गदर्शन करताना श्री. अमित सर्जे सोबत श्री. सचिन बेंडखळे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, विद्यार्थी व उपस्थित मान्यवर

## वाढती लोकसंख्या समस्या नसून देशाचे शक्तीसाधन : डॉ. सुभाष कोंबडे

अर्थशास्त्र विभागाच्यावतीने 'जागतिक लोकसंख्या दिना'निमित्त प्रा. डॉ. सुभाष कोंबडे यांचे 'वाढती लोकसंख्या : संधी, गुणवत्ता व आव्हाने' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी वाढती लोकसंख्या ही देशाची साधनसंपत्ती असल्याने ती समस्या न मानता शक्तीसाधने कशी बनतील याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. १९२१ मध्ये धोंडो केशव कर्वे यांनी सर्वप्रथम लोकसंख्येचा प्रश्न नियंत्रणाचे विचार मांडले. चीन, जपान व अमेरिकेपेक्षा भारतामध्ये कार्यक्षम लोकसंख्या अधिक आहे त्यामुळे लोकसंख्या बोजा नसून गुणात्मक संसाधन आहे. आज ब्रेनड्रन होते ते रोखल्यास देशाचा विकास झपाट्याने होईल, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते. त्यांनी, वाढत्या लोकसंख्येची चिंता न मानता गुणवत्ता वाढीची जाणीव लोकांना झाली पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन अर्थशास्त्र विभागाच्यावतीने करण्यात आले होते.



जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. सुभाष कोंबडे व प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व उपस्थित मान्यवर.

## धकाधकीच्या जीवनामध्ये योगसाधना महत्त्वाची : प्राचार्य डॉ. शानेदिवाण

महाविद्यालय व ५ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनाचे औचित्य साधून १५ दिवसाच्या योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. या प्रसंगी, धकाधकीच्या जीवनात मानवास योगधारणा अतिशय उपयुक्त आहे, शैक्षणिक दृष्ट्या आपल्या जीवनात योग, ध्यानधारणा इत्यादीला महत्त्व प्राप्त झाले आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले. या योग शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून योगशिक्षक श्री. राजेंद्र ताम्हणकर यांनी विविध योगासने, प्राणायम व सूर्यनमस्काराच्या प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. या प्रसंगी लेप्ट. प्रशासकीय कर्मचारी व एन.सी.सी. कॅडेटस् प्रशांत पाटील व महाविद्यालयातील प्राध्यापक, मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जागतिक योग दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये १५ दिवसाच्या योग प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभागी विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी.

# जयंती नाला परिसर महास्वच्छता अभियान व तंबाखू विरोधी मोहिमेचे आयोजन





महास्वच्छता अभियानात सहभागी विद्यार्थी, प्राध्यापक व सेवक वर्ग.

महाविद्यालयाच्यावतीने कोल्हापूर महानगरपालिकेच्या सहकार्याने जयंती नाला परिसर महास्वच्छता अभियान व तंबाखू विरोधी मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. महानगरपालिका आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या मार्गदर्शनाने स्वच्छतेस प्रारंभ करण्यात अल. यावेळी एन.एस.एस. स्वयंसेवक, एन.सी.सी. कॅडेट, विद्यार्थी, प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. या सर्वांच्या सहभागाने जयंती नाला, महाविद्यालय परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. या मोहिमेदरम्यान आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांनी 'तंबाखू विरोधी व स्वच्छतेविषयक' शपथ दिली. मोहिमेविषयी बोलताना प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण म्हणाले, 'विद्यार्थ्यांना स्वत:च्या स्वच्छतेबरोबरच घर व परिसराच्या स्वच्छतेची सवय लागली पाहिजे. प्रत्येकाने हे तत्व पाळल्यास आपला परिसर आपोआपच स्वचछ होईल. शहाजी महाविद्यालयाचा परिसर गेली २५ वर्षे 'व्यसनमुक्त परिसर' म्हणून ओळखला जातो. या संयुक्त स्वच्छता मोहिमेत महानगरपालिकेचे पदाधिकारी, कर्मचारी तसेच महाविद्यालयातील सर्वच घटकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

## प्रचंड उत्साहपूर्ण वातावरणात 'ग्रीन कॉर्नर'चे उद्घाटन



'हरित कोपरा' उपक्रमाचे उद्घाटन करताना डॉ. एम. बी. वाघमारे व उपस्थित मान्यवर.

महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातर्फे ग्रीन कॉर्नर (हरित कोपरा) हा उपक्रम सुरु करण्यात आला. या उपक्रमाचे उदघाटन प्रमुख पाहुणे न्यू कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एम. बी. वाघमारे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते. प्रबंधक श्री. रवी भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. या वर्षीची ग्रीन कॉर्नरची सुरुवात श्रीकृष्ण प्रिय कदंब या वृक्षाच्या माहितीने तर ओळख वनस्पती शास्त्रज्ञांची या अंतर्गत जीवाश्मांचा अभ्यास करण्याऱ्या बिरबल सहानी यांची माहिती देऊन करण्यात आली.

प्रमुख पाहुणे डॉ. एम. बी. वाघमारे आणि प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. तसेच या उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या बी.एस्सी. भाग २ व ३ च्या विद्यार्थांना शाबासकी देऊन प्रोत्साहित केले. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. मकरंद ऐतवडे यांनी या उपक्रमाचे महत्व आणि उपयुक्तता उपस्थितांना सांगितली. या उपक्रमाचे आयोजन वनस्पतीशास्त्र विभागाने केले.

## 'ॲनिमल प्लॅनेट' भित्तीपत्रकाचे उद्घाटन



***Animal Planet*** चे उद्घाटन करताना प्रा. आर. पी. देठे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व उपस्थित मान्यवर.

महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागातर्फे ***Animal Planet*** हा उपक्रम सुरु करण्यात आला. या उपक्रमाचे उदघाटन शाहू कॉलेजच्या प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख श्री. आर. पी. देठे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण हे होते. या वर्षाची ***Animal Planet*** ची संकल्पना ही ओळख मानवी अवयवांची असून या अंतर्गत मानवी डोळा या अवयवाची माहिती देऊन करण्यात आली. या उपक्रमाची माहिती श्री. स्वप्नील पोवार यांनी उपस्थितांना सांगितली. मानवी डोळ्याची शास्त्रीय माहिती निकिता पाटील या विध्यार्थीनी दिली.

## संख्याशास्त्र विभागात डॉ. पी. व्ही. सुखात्मे यांची १०८ वी जयंती साजरी

महाविद्यालयातील संख्याशास्त्र विभागातर्फे थोर भारतीय संख्याशास्त्रज्ञ डॉ. पी. व्ही. सुखात्मे यांचा १०८ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्मक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे नॅक समन्वयक डॉ. एन. एस. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्मक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण हे होते. प्रास्ताविक बी.एस्सी. भाग-३ मधील विद्यार्थिनी प्रणाली पाटील हिने केले. डॉ. पी. व्ही. सुखात्मे यांच्या कार्याची ओळख प्रा. के. एम. माळी यांनी करून दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## छत्रपती राजाराम महाराजांच्या जीवनावर आधारित भित्तीपत्रकाचे उद्घाटन



इतिहास विभागाच्या 'राजमुद्रा' भित्तीपत्रकाचे उद्घाटन करताना मा. वसंत भोसले व उपस्थित मान्यवर.

इतिहास विभागाच्यावतीने छत्रपती राजाराम महाराजांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून 'छत्रपती राजाराम महाराजांचे कोल्हापूर संस्थानाच्या विकासातील योगदान' या विषयावर आधारित भित्तीपत्रकाचे उद्घाटन दैनिक लोकमतचे संपादक श्री. वसंत भोसले यांच्या हस्ते संपन्न झाले. श्री. भोसले यांनी छत्रपती राजाराम महाराजंच्या कार्याचा आलेख मांडण्याचा उपक्रम स्तुत्य असल्याचे नमूद करताना इतिहास विभागातील विद्यार्थ्यांचे कौतुक केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व इतिहास विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

## केंद्रीय प्रवेश समिती संकलन केंद्र

**इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती-२०१९-२०२० अंतर्गत महाविद्यालयात इ. ११ वी अर्ज संकलन कार्यरत होते. या समितीचे कामकाज दि. २४ जून २०१९ ते २९ जून २०१९ या कालावधीत पार पडले.**

**प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या मार्गदर्शनाखाली या समितीमध्ये समितीप्रमुख म्हणून श्री. एन. सी. कुंभार यांनी काम पाहिले तर श्री. एस. के. पाटील, श्री. व्ही. ए. पाटील, श्री. पी. के. पाटील यांनी प्रवेश अर्ज संकलक म्हणून आणि श्री. व्ही. एच. पुंदीकर, श्री. डी. व्ही. उलपे यांनी संगणक तज्ज्ञ म्हणून कामकाज पाहिले.**

## शिवाजी विद्यापीठ, आजीवन अध्ययन व विस्तार विकास कोर्सेसमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सुयश

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत, आजीवन अध्ययन व विस्तार विकास विभागाच्या विविध प्रमाणपत्र व पदवीका अभ्यासक्रमात श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील विविध विभागांच्या विद्यार्थ्यांनी चांगल्या गुणांनी यश संपादन केले. या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. डी. के. वळवी, डॉ. डी. एल. काशिद-पाटील, डॉ. सौ. एस. एस. पाटील, प्रा. प्रशांत पाटील, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. आर. डी. मांडणीकर, प्रा. के. एम. देसाई, डॉ. मकरंद ऐतवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

| अ.क्र. | कोर्स | विभाग | विद्यार्थ्याचे नांव | टक्के |
|---|---|---|---|---|
| १. | 'ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद' | मराठी | कु. साधना मारूती दावणे | ६१.५० |
| २. | 'ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम' | भूगोल | कु. शितल संजय संकपाळ | ७९.५० |
| ३. | 'हिंदी अनुवाद' | हिंदी | कु. ज्योती शंकर पोवार | ७९.५० |
| ४. | 'प्राथमिक योग' | क्रीडा | कु. वैष्णवी विलास शेवाळे | ८१.०० |
| ५. | मोडी लिपी | इतिहास | कु. संगीता आनंद गायकवाड | ८५.०० |
| ६. | पंचायत राज | राज्यशास्त्र | कु. अंकिता अशोक पोवार | ८२.५० |
| ७. | सुगंधी व औषधी वनस्पती : ओळख व संवर्धन | वनस्पतीशास्त्र | कु. प्रियांका शामराव पाटील | ८७.५० |
| | | | कु. सलोनी दिपक खोचीकर | ८७.५० |
| ८. | समाजकार्य शिक्षण | समाजशास्त्र | कु. सरिता यशवंत पाटील | ७६.६७ |

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे आजीवन अध्ययन व विस्तार विकास विभागाच्या सन २०१९-२० करिता खालील कोर्ससला प्रवेश सुरू आहेत

| कोर्स | विभाग | समन्वयकाचे नांव | मोबाईल नं. |
|---|---|---|---|
| १. 'ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद' | मराठी | डॉ. डी. के. वळवी | ९४२०१३५१७० |
| २. 'ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम' | भूगोल | डॉ. डी. एल. काशिद-पाटील | ८६०५१२७३७३ |
| ३. 'हिंदी अनुवाद' | हिंदी | डॉ. सौ. एस. एस. पाटील | ९२२७७०६६१ |
| ४. 'प्राथमिक योग' | क्रीडा | प्रा. पी. बी. पाटील | ९८२२२४४२०२ |
| ५. मोडी लिपी | इतिहास | डॉ. एस. डी. जाधव | ९९७५५०६७५५ |
| ६. पंचायत राज | राज्यशास्त्र | डॉ. आर. डी. मांडणीकर | ९८८१५७८७८२ |
| ७. समाजकार्य शिक्षण | समाजशास्त्र | डॉ. के. एम. देसाई | ८४८५८५९२२२ |
| ८. सुगंधी व औषधी वनस्पती : ओळख व संवर्धन | वनस्पतीशास्त्र | डॉ. एम. एम. ऐतवडे | ८२०४८३७८३९ |
| ९. व्यक्तिगत सौंदर्य आणि संवर्धन | स्त्री व्यक्तिमत्व विकास समिती | डॉ. सौ. एस. एस. राठोड | ९९२३८०९१७३ |
| १०. ग्रंथालय व्यवस्थापन | शिवाजी ग्रंथालय | डॉ. पी. बी. पाटील | ९२७२४७४३५४ |
| ११. Pragmatic English | English Dept. | डॉ. यु. बी. मुजुमदार | ९४०३९१६७०० |
| १२. मानवी हक्क | स्पर्धा परीक्षा | डॉ. व्ही. जी. देठे | ९०११६४८९८७ |

## विद्यार्थ्यांनी घेतला भात लावणीचा अनुभव



'एक दिवस शेतावर' या उपक्रमातंर्गत भात लावणी करताना भूगोल विभागाचे विद्यार्थी.

विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयी आवड निर्माण व्हावी आणि शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या कष्टाचे वास्तव समजण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या भूगोल विभागाच्या वतीने 'एक दिवस शेतावर' या उपक्रमातंर्गत 'भात लावणी'चा अनुभव घेण्यात आला. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या मार्गदर्शनाखाली व भूगोल विभागाच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांसोबत शेतीची कामे केली. पन्हाळा तालुक्यातील गवळीवाडीतील शेतकरी श्री. तुकाराम भिवाजी गवळी यांच्या शेतावर भात लावणी करताना शेतकऱ्याच्या कुटुंबाच्या श्रमाची प्रत्यक्ष अनुभूती घेता आली. घटत्या शेतीक्षेत्राबरोबर युवावर्ग हळूहळू शेतीपासून दुरावत चालला आहे. त्यांनी स्वत:ला छोट्या-छोट्या नोकऱ्यांमध्ये गुंतवून ठेवले आहे. अशा युवकांना पुस्तकी ज्ञानाबरोबर आपल्या आजूबाजूला मशागत होत असलेली शेती कशी होते? शेती करणाऱ्या कुटुंबचे कष्टप्रद जीवन, त्यांच्या श्रमाचे मूल्य कसे होते? याची जाणीव होणे गरजेचे आहे. या अभिनव उपक्रमाबाबत बोलताना प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण म्हणाले, अशा उपक्रमाच्या माध्यमातून शेतीपासून दुरावत चाललेला युवावर्गाला शेतीकडे निश्चितच व्यवसाय म्हणून पाहू लागेल व आपले करिअर शोधण्याचा प्रयत्न करेल. या उपक्रमाचे आयोजन भूगोल विभागाच्या वतीने करण्यात आले.

## उमेश राजाराम खोत याचे हॉटेलमध्ये काम करून १२ वी वाणिज्य शाखेत मिळविले घवघवीत यश

कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचा विद्यार्थी उमेश राजाराम खोत याने कोल्हापूरातील हॉटेलमध्ये आठ-आठ तास काम करून बारावी वाणिज्य शाखेतून ८०.९२ टक्के गुण मिळवून दैदिप्यमान यश मिळविले. कष्ट करून मिळविलेल्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व सर्व प्राध्यापकांनी उमेशचे कौतुक केले आहे.



उमेश खोत याचे मूळ गाव कोल्हापूरातून ८१ किलोमीटर असणाऱ्या भुदरगड तालुक्यातील पडखंबे पैकी खोतवाडी. खोतवाडीचा संपूर्ण परिसर जंगलमय. गतवर्षीपर्यंत गावाला डांबरी रस्ताच नाही अशी परिस्थिती. जगण्याचे साधनच गावी नसल्याने उमेशचे वडील २० वर्षापासून कोल्हापूरातील प्रार्थना हॉटेलमध्ये काम करतात व तेथेच राहतात. गावात दहावी-बारावीच्या शिक्षणाची सोय नसल्याने उमेश व त्याचा भाऊ कोल्हापूरात चार वर्षापूर्वी आले. मिस क्लार्क हॉस्टेल आणि कोरगावकर यांच्या विनयकुमार छात्रालयात ते मोफत राहू लागले. शिक्षणाचा आणि जेवणाचा खर्च भागविण्यासाठी महिना तीन हजार रुपये पगारावरती उमेशने हॉटेलमध्ये आठ-आठ तास काम केले. चार तास कॉलेज केले आणि चार तास अभ्यास करून वाणिज्य शाखेत ८१ टक्के गुण मिळवून त्याने घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था व श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे त्याचे व त्याच्या वडिलांचे कौतुक करण्यात आले.

या यशाबद्दल उमेश म्हणाला, शिक्षण घेताना कष्टाची लाज कधी बाळगली नाही. कोण काय म्हणतील याकडे लक्ष दिले नाही आणि खोटी प्रतिष्ठाही बाळगली नाही. यापुढे मला सी.ए. व्हायचे आहे.

उमेशचे वडील राजाराम खोत म्हणाले, पोरगं हॉटेलमध्ये काम करून शिकला. त्याचे यश आम्हाला डोंगराएवढे वाटत आहे. आई-वडिलांच्या परिस्थितीची जाणीव त्याला आहे. त्याला महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.


### ✲ संपादक मंडळ ✲

- संपादक : प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण
- कार्यकारी संपादक : डॉ. सुरेश शिखरे
- सहसंपादक : डॉ. पी. बी. पाटील

• सदस्य •

| | | |
|---|---|---|
| प्रा. एस. एच. कांबळे | प्रा. पी. बी. पाटील | डॉ. एम. एम. ऐतवडे |
| प्रा. व्ही. एच. पुंदीकर | प्रा. सागर चरापले | श्री. आर. जे. भोसले |


## भूगोल विभागाच्यावतीने मसाई पठार येथे वृक्षारोपण



भूगोल विभागाच्यावतीने मसाई पठार येथे वृक्षारोपणाकरिता सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक.

महाविद्यालयाच्या भूगोल विभागाच्या वतीने मसाई पठार येथे वृक्षारोपण करून 'वनसंवर्धन दिन' साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाच्या ३३ कोटी वृक्षारोपण उपक्रमात सहभागी म्हणून भूगोल विभागाच्या वतीने मसाई पठार पदभ्रमंती व वृक्षारोपण अशा संयुक्त उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात बी.ए. भाग-२ व ३ मधील भूगोल विभागाच्या विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थी व प्राध्यापकांना मसाई पठारावरील मुसळधार पाऊस, वेगाने वाहणारा वारा, पठाराचे लॅन्डस्लायडिंगमुळे तयार झालेले तीव्र कडे, मृदा धूप, पाण्याचे छोटे-छोटे प्रवाह, छोट्या प्रवाहापासून तयार होणारे ओढे-नाले, पावसामुळे खचलेल्या जमिनी इ. भौगोलिक भूदृश्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. अशा विद्यार्थी केंद्रीत उपक्रमांना प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे मार्गर्शन लाभले. या उपक्रमाचे आयोजन भूगोल विभागाच्या वतीने करण्यात आले

## इ. १२ वी परीक्षेत विद्यार्थ्यांचे उत्तुंग यश

कनिष्ठ विभागातील १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यामध्ये वाणिज्य विभागाचा निकाल ८३.५० टक्के तर एकूण निकाल ६१ टक्के लागला आहे. कला व वाणिज्य शाखेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे. **वाणिज्य शाखा :** १) कु. शिवानी संजय बन्ने - ८२.९२%, २) कु. उमेश राजाराम खोत - ८०.९२%, ३) कु. नेहा हंबीरराव पाटील - ७७.३८%, ४) कु. वैष्णवी दिपक संकपाळ - ७७.३८%, ५) कु. प्रतिक्षा विश्वास लाड - ७६.१५%, ६) कु. आरती विकास शिंदे - ७६.०५%, ७) कु. कृतिका खंडेराव घोडके - ७६.००%.

**कला शाखा :** १) कु. प्रज्ञा शेवाळे - ७८.६१%, २) कु. ऋतुजा पाटील - ७६.४६%, ३) कु. नलीनी पाटील - ७६.००%

इ. १२ वी परीक्षेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे चेअरमन मा. श्री. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व कनिष्ठ विभागाच्या शिक्षकांचे बहूमोल मार्गदर्शन लाभले.



केंद्रीय प्रवेश प्रक्रियेनुसार पहिल्या फेरीत प्रवेश प्राप्त झालेल्या इ. ११वी कला व वाणिज्य शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा 'महाविद्यालयातील पहिला दिवस' याचे औचित्य साधून प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे हस्ते प्रवेशित विद्यार्थ्यांमधील प्रत्येक वर्गातील गुणानुक्रमे पहिल्या दहा विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन प्रातिनिधीक स्वागत करण्यात आले.



५ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. कोल्हापूर मार्फत विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे 'प्लॅस्टिक प्रदूषण पंधरवडा' निमित्त आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत महाविद्यालयाची एन.सी.सी. कॅडेट कु. शितल मोरे हिने प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे हस्ते प्रशस्तिपत्र प्रदान करताना.



इ. १२ वीच्या कला व वाणिज्य शाखेतील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा 'स्कॉलर बॅच'चे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या हस्ते दि. २२ जुलै २०१९ रोजी झाले. उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. शानेदिवाण म्हणाले, स्कॉलर बॅचचे विद्यार्थी ही महाविद्यालयाची नवी ओळख निर्माण करू शकतात. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी आपल्या अथक परिश्रम व अभ्यासाच्या आधारे महाविद्यालयाच्या लौकिकात भर घालावी. या कामी विद्यार्थ्यांना लागणाऱ्या मार्गदर्शनासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्वच शिक्षक सर्वोतोपरी प्रयत्नशील असतील, अशी ग्वाही देताना स्कॉलर बॅचच्या विद्यार्थ्यांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. स्कॉलर बॅच प्रमुख प्रा. यु. एस. अपराध यांनी 'बॅच'ची संकल्पना स्पष्ट केली.



कनिष्ठ विभागात वाणिज्य शाखेकडे अध्यापनाचे कार्य करणारे श्री. के. डी. सोनाळकर दि. ३१ मे २०१९ रोजी आपल्या ३४ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले. दि. १५ जुलै १९८५ रोजी महाविद्यालयाच्या सेवेत रूजू झालेल्या श्री. सोनाळकर यांनी वाणिज्य शाखेतील विविध विषयांचे अध्यापन केले. श्री. सोनाळकर यांच्या सेवानिवृत्तीचे औचित्य साधून त्यांचा सपत्निक सत्कार प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या हस्ते करण्यात आला. श्री. सोनाळकर यांचे सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य आरोग्यसंपन्न जावे अशी सदिच्छा देत असताना त्यांच्या महाविद्यालयातील प्रदीर्घ सेवेबद्दल प्राचार्य डॉ. शानेदिवाण यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

हार्दिक अभिनंदन

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा स्वयंसेवक विकास शिवाजी नागरपोळे यास शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना सन २०१८-१९ चा कोल्हापूर जिल्हास्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला. त्याला प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, कार्यक्रम अधिकारी डॉ. शिवाजी जाधव, डॉ. राहुल मांडणीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या कु. माधुरी चेचर हिने कोल्हापूर विभागीय मैदानी स्पर्धेमध्ये १५०० मिटर धावणे प्रकारामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. तिची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली.



✲ 'शहाजी बुलेटिन' या त्रैमासिकाचे प्रकाशन श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर येथून करण्यात आले. ✲ 'शहाजी बुलेटिन'या त्रैमासिक अंकातील मजकुराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
✲ फक्त खासगी वितरणासाठी. वर्ष : दुसरे, त्रैमासिक अंक ६वा (एप्रिल / मे/ जून २०१९) ✲ मुद्रक : प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर.